Historicity Research Journal
ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 10 | June– 2017

# वाकाटक कालीन - मराठवाडयातील कला व स्थापत्य

प्रा. डॉ. एस.पी. शिंदे
इतिहास विभाग, प्रमुख , शिवाजी महाविघालय सातारा.



**प्रस्तावनाः-**

दक्षिण भारतात जी अनेक महत्वाची राजघराणी होऊन गेली; त्या राजघराण्यांमध्ये वाकाटक राजघराणे उल्लेखनीय ठरते. वाकाटक राजघराण्यांने इ.स. २५० पासून ५५० पर्यंत म्हणजे तीनशे वर्ष दक्षिण भारतावर राज्य केले. वाकाटक राजघराण्याची राजधानी विदर्भात नागपूर जिल्ह्यातील रामटेक जवळील नंदिवर्धन होती. वाकाटक राजघराण्याच्या नंदिवर्धन आणि वत्सगुल्म या दोन शाखा होत्या. नंदिवर्धन ही वाकाटकांची जेष्ठ शाखा असून, प्रथम प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र आणि गौतमीपुत्राचा पुत्र प्रथम रुद्रसेन याने या शाखेची स्थापना केली. तसेच प्रथम प्रवसरसेन याचा दुसरा पुत्र सर्वसेन याने वत्सगुल्म शाखेची स्थापना केली. वत्सगुल्म म्हणजेच आजचे विदर्भातील वाशिम होय. वाशिम हे आज जिल्ह्याचे ठिकाण आहे. वाकाटक राजघराण्यांने विदर्भातुन दक्षिण भारताच्या बऱ्याच भुभागावर राज्य केले. दक्षिण भारतातच मराठवाडा हा प्रदेश समाविष्ट होता. वाकाटकांनी संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. या काळात मराठवाड्याची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, कला व स्थापत्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. गुप्त सम्राटाप्रमाणेच वाकाटक सम्राटांनीही कला व स्थापत्याला आश्रय दिला. त्यामुळे त्यांच्याही कालखंडात कला व स्थापत्याचा मोठा विकास झाला. प्रस्तुत शोध निबंधात वाकाटककालीन मराठवाडयातील कला व स्थापत्याचा आढावा घेतला आहे.

## वाकाटकाच्या इतिहासाची साधने -

प्राचीन दक्षिण भारताच्या इतिहासात अतिशय महत्वाचे राजघराणे असणाऱ्या वाकाटकांच्या अभ्यासासाठी पुणे ताम्रपट, वाशीम ताम्रपट, शिवनी ताम्रपट, जांब ताम्रपट, वराहदेवाचा अंजिठा येथील लेख, वराहदेवाचा घटोत्कच लेण्यातील लेख, अंजिठा येथील लेणी क्र. १, २, १६, १७,१९ याबरोबरच पुराणग्रंथातील वाकाटकांची माहिती, नागपूरजवळील रामटेक व पवनार येथील मूर्ती, राजा प्रवरसेनाचे 'सेतूबंध' काव्य इ. महत्वाची साधने उपलब्ध आहेत.

## वाकाटकांचा राजकीय इतिहास -

मराठवाडयावर प्रथम सातवाहन घराण्याने राज्य केले. सातवाहन घराण्याच्या कारकिर्दीपासूनच मराठवाडयाच्या राजकीय इतिहासाचा प्रारंभ होतो. सातवाहन घराण्याने इ.स.पू. २३० पासून इ.स. २३० पर्यंत राज्य केले.[१] या घराण्याने एकूण ४६० वर्ष राज्य केले. या घराण्यानंतर वाकाटक घराणे सत्तेवर आले. वाकाटकांची राजवट ही मराठवाडयासाठी कला व स्थापत्याच्या दृष्टिकोनातून सुवर्णकाळ ठरते. या राज घराण्याची राजधानी विदर्भातील नागपूर जिल्हयातील रामटेक जवळील नंदीवर्धन होती.[२] प्रथम विंध्यशक्ती हा वाकाटक वंशातील पहिला राजा असून तो वाकटक घराण्याचा संस्थापक मानला जातो. वाकाटकांच्या दोन शाखा अस्तित्वात होत्या. नंदिवर्धन ही जेष्ठ शाखा तर वत्सुगुल्म ही कनिष्ठ शाखा होती. वत्सगुल्म शाखेने संपूर्ण मराठवाडयावर राज्य केले.

अजिंठा लेणीतील कोरिवलेखात प्रथम विंध्यशक्ती याचा उल्लेख द्विज असा केला आहे. यावरुन वाकाटक ब्राह्मण जातीय होते.[३] याची सत्यता पटते. प्रथम विंध्यशक्तीनंतर प्रथम - प्रवरसेन गादीवर आला. त्याच्या मृत्यूनंतर नंदीवर्धन (जेष्ठ शाखा) व वत्सगुल्म (कनिष्ठ शाखा) अशा दोन राजवटी निर्माण झाल्या. वत्सगुल्म शाखेने मराठवाडयावर जवळजवळ इ.स. ५५० पर्यंत राज्य केले.

## वाकाटककालीन मराठवाडयातील कला व स्थापत्य -

कला हा शब्द स्त्रिलिंगी आहे. चित्र, संगीत नाटय, स्थापत्य व शिल्प इ. घटकांना सामान्यपणे कला असे म्हटले जाते. महाराष्ट्र शब्दकोशात कौशल्याच्या कामाला कला असे म्हटले आहे.[४] महाराष्ट्र शब्दकोशात दिलेला हा अर्थ कला शब्दाच्या आधुनिक अर्थाशी

जवळचा वाटतो. कलेमध्ये भावनेला फार महत्व आहे. अंत:करणातील भावना व्यक्त करण्याचे कौशल्य म्हणजे कला होय, अशी कलेची समर्पक व्याख्या केली जाते. कलेचे वर्गीकरण करताना दृश्य कला, श्राव्य कला आणि दृश्य श्राव्य -कला असे वर्गीकरण केले जाते. दृश्य कलेमध्ये शिल्प, स्थापत्य व चित्र इ. चा समावेश होतो. श्राव्य कलेत संगीताचा समावेश होतो. तर नृत्य, चित्रपट व नाटय इ. चा दृश्य - श्राव्य कलेत समावेश केला जातो. थोडक्यात कला म्हणजे सौंदर्ययोगच आहे. अनेक ऋषी व देवतांना कलाकारांनी आदर्श मानून त्यांचेपासून प्रेरणा मिळावी, आपल्या कलेचे अधिक समर्थपणे सादरीकरण व्हावे म्हणून कलाकारांनी देवतांना स्थान दिलेले दिसून येते. तसेच कलेद्वारे ईश्वराला मानवाच्या जवळ आणण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो.

वाकाटक राजघराण्याने आपल्या तीनशे वर्षाच्या राजवटीत कला आणि स्थापत्य क्षेत्रात भरीव स्वरुपाची प्रगती केली. वाकाटक राजे शिव आणि विष्णूचे उपासक होते. तरीही त्यांनी बौध्द धर्माला राजश्रय दिला. त्यामुळेच वाकाटकांच्या काळात मराठवाडयातच नव्हे तर संपूर्ण राज्यात हिंदू आणि बौध्द कला आणि स्थापत्याची निर्मिती झाली . या काळात मराठवाडयात बौध्द व हिंदू लेणी, बौध्द स्तूप व विहार, चित्रकला आणि मूर्तिशिल्प निर्माण करण्यात आले. अंजिठा, वेरुळ, औरंगाबाद, उस्मानाबाद, कंधार, नांदेड, शिरुर आणि घटोत्कच या ठिकाणी वाकाटक काळातील कला व स्थापत्य आढळते

### लेणी स्थापत्य -

प्राचीन भारतीय वास्तु कलेत लेणी स्थापत्य हा विकसित झालेला स्वतंत्र कलाविष्कार अर्थात वास्तुप्रकार आहे. लेणी स्थापत्यालाच गुहा मंदिर, स्थापत्य, शैलगृह, शैल स्थापत्य आणि गुंफा या नावानेही ओळखले जाते. राजे महाराजे, व्यापारी लोक व बौध्द भिक्खू- भिक्खुणींनी लेणी खोदकामासाठी दान दिले. लेणीच्या स्थापत्य प्रकाराला .अनुकूल असेलेला खडक ज्या ठिकाणी उपलब्ध आहे, अशाच डोंगरात लेणीचे खोदकाम केले.

### औरंगाबाद -

औरंगाबाद या नगरास मराठवाडयाची राजधानी म्हणून ओळखले जाते. कला आणि स्थापत्याच्या दृष्टीने या नगरास महत्वाचे स्थान आहे. या ठिकाणच्या बीबीका मकबऱ्यापासून ३ कि.मी. अंतरावर सहयाद्री पर्वताच्या रांगेत १२बौध्द[५] लेणीचे खोदकाम करण्यात आले. यापैकी लेणी क्रमांक १,२, ५, ६, ७ व ८ या लेणी वाकाटक काळातील आहेत. या लेण्यांमध्ये नागराज, पद्मपाणी, गंधर्व, बोधिसत्व, श्री गणेश, अवलोकितेश्वर, राजतडाग नर्तिका इ. शिल्प आहे.

### वेरुळ -

औरंगाबाद जिल्हयात खुलताबाद तालुक्यात वेरुळ नावाचे गाव आहे. या गावाजवळील चरणाद्री डोंगरात एकूण ३४ लेणी खोदलेल्या आहेत. यातील बौध्द लेणी पैकी क्रमांक १ ते ५ या लेणीचे खोदकाम वाकाटक कालखंडामध्ये इ.स. ५ व्या व ६ व्या शतकात करण्यात आले. लेणी क्र. १ ते ४ मध्ये भिक्षुगृहे, धनपती जांभाल, गंधर्व, किन्नर, बुध्दमुर्ती, स्त्रीसेविका मूर्ती आहेत. क्रमांक ५ ही लेणी 'महारवाडा' व 'थेरवाडा' या नावाने ओळखली जाते.[६] या लेणीच्या माथ्यावरुन एक जलप्रवाह पुढील दरीत सतत कोसळत असतो.

### अजिंठा -

औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यात 'अजिंठा' हे गाव आहे. औरंगाबादपासून अंजिठा ११० कि.मी. अंतरावर आहे. येथील असणाऱ्या ३० लेणीपैकी लेणी क्र. १,२,१६, १७ व १९ हया वाकाटक कालीन लेणी म्हणून ओळखल्या जातात.लेणी क्र. १ मध्ये गौतम बुध्दाची जगातील सर्वश्रेष्ठ मूर्ती म्हणून ओळखली जाते. या मूर्तीचे वैशिष्टय असे की, आपण मूर्ती पाहण्याची जागा बदलली की मूर्तीचे हावभाव सुध्दा बदलतात. इतर लेण्यामध्ये पंचिक व हारिती, शिक्षक , मुले, मेंढया, नागराज, स्तुप, शिलालेख इ. शिल्पे आहेत. लयनस्थापत्याच्या दृष्टीने अंजिठा लेणी जगप्रसिध्द आहेत.

### घटोत्कच -

मराठवाडयातील औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यातील जगप्रसध्दि अजिंठा लेण्यांच्या पश्चिमेस १० मैल अंतरावर जंजाल, जिजाळ, जंजाळा गावापासून ३ मैल अंतरावर असणाऱ्या डोंगरामध्ये घटोत्कच लेणी विहार आहे.[७] घटोत्कच लेणी वाकाटक राजा हरिषेणाचा मंत्री वराहदेव[८] याने खोदविल्या. या लेणी अजिंठा येथून दूर असल्या तरी त्या अजिंठा येथील लेणी समुहाचाच एक भाग मानला जातो. पुर्वी येथे तीन लेणी होती असे दिसते. परंतु सध्या दोन लेण्या पाहण्यासारख्या असून तिसऱ्या लेणीच्या फक्त काही खुणा तेवढया दिसतात. घटोत्कोच लेणीत गौतमबुध्द, स्त्री भिक्षुणी, २० खांब, सभागृह, ब्राम्ही लिपीतील शिलालेख, हरिण इ. मूर्ती आहेत.


**घटोत्कच लेणी** →



## शिऊर लेणी -

नांदेड जिल्हयातील हदगाव तालुक्यात शिऊर नावाचे एक खेडेगाव आहे. हे गाव मराठवाडा विदर्भ सरहद्दीवर असून नांदेडपासून सुमारे ९० कि.मी. अंतरावर आहे. शिऊर गावाच्या नैऋत्येला एक लहान माळटेकडी आहे. या टेकडीत तीन लेण्या आहेत. या लेणीचे खोदकाम सम्राट विंध्यशक्ती दुसरा यांच्या काळात झाले असावे.[९] या लेण्यांमध्ये कोरण्यात आलेली सर्व शिल्पे वैष्णव पंथाची आहेत. शिऊरच्या लेणी वैष्णव पंथाच्या ठरतात. येथील लेण्यांमध्ये ब्रह्मा, विष्णू, त्रिविक्रम, नृसिंह, वराह, राम, सप्तमातृका, कृष्ण, गरुड, केशव, हत्ती इत्यादी शिल्पे आढळतात.


**शिऊरची लेणी** →



## उस्मानाबाद -

उस्मानाबाद या नगराचे प्राचीन नांव नागसेननगर व धाराशिव होते. उस्मानाबाद येथील लेणी 'धाराशिव लेणी' म्हणून प्रसिध्द आहेत. लेणी खोदकामात करकंड राजास तेरच्या शिव राजाने बरीच मदत केली होती. लेणी - खोदकाम करीत असताना जिवंत पाण्याचा झरा आढळून आला. त्यामुळे शिव राजा आणि धारा (झरा) यावरुन कदाचित धाराशिव[१०] असे नाव पडले असावे. पुढे निजाम राजवटीत निजामाच्या मीर उस्मान अलीखान याच्या नावावरुन या नगरास उस्मानाबाद असे नाव देण्यात आले. उस्मानाबाद नगराच्या पश्चिमेस हातला देवीच्या डोंगरामध्ये एकूण ७ लेणी आहेत. यापैकी लेणी क्रमांक १ ते ४ जैन लेणी असून बाकीच्या तीन लेणी हया हिंदू असाव्यात.[११] पहिल्या चार लेण्यापैकी क्रमांक २ व ३ या लेणीचे खोदकाम वाकाटक कालखंडात झाले आहे. या लेणीमध्ये पार्श्वनाथ, सात फण्याचा सर्प, यक्ष, विद्याधर, हरीण इत्यादी शिल्पे आढळतात.

धाराशिव लेणी →



## स्तूप स्थापत्य -

वाकाटक काळात लेणी आणि स्तूप स्थापत्याची निर्मिती करण्यात आली. प्रामुख्याने बौध्द स्मारकासाठी स्तूप हा शब्द वापरला जातो. कंधारच्या (नांदेड) दक्षिणेस एक माळ्टेकडी आहे. ती बुध्दटेकडी या नावाने ओळखली जाते. या माळ्टेकडीच्या उतरणीत बौध्द विहार आणि पूर्वेस बौध्द स्तुपाचे[१२] अवशेष मिळाले. अर्थात वाकाटक कालखंडात स्तूप बांधल्याची उदाहरणे फारशी आढळून आली नाहीत.

## वादनकला -

नृत्य गायकाला ताल व साथ देण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या ध्वनीयुक्त साधनाला वाद्य म्हणतात. वाद्य वाजवण्याच्या कौशल्याला वादनकला म्हणतात.[१३] मराठवाडयातील अजिंठा लेणीच्या चित्रावरुन तत्कालीन वाद्यसंस्कृतीची आणि वाद्यांची माहिती मिळ्ते. अजिंठा लेणी क्र. १ व १६ मध्ये कच्छपी वीणेचे, लेणी क्र.१७ मध्ये आलापिनी वीणेचे चित्र आहे. लेणी क्र. १ मध्ये झर्झर नावाच्या घनवाद्याचे चित्र चितारले आहे. तसेच याच लेणीत पाश्चात्य गिटारच्या धर्तीची वीणा मांडीवर घेतलेल्या पुरुषाचे चित्र पहावयास मिळते.

## नृत्यकला -

नृत् या धातू वरुन नृत्य, नर्तन असे शब्द बनले आहेत. उत्तम नर्तन करण्याच्या कलेला नृत्य कला म्हणतात. महाराष्ट्र शब्दकोशात नाचणारा, नाचकाम करणारा, नाच्या आदीला नर्तक म्हटले आहे. नृत्य करणाऱ्या स्त्रीला नर्तकी म्हणतात. तिला नृत्यांगना, नटी, कलावंतीण असेही म्हणतात. अजिंठा लेणी क्र. १७ मध्ये भिंतीवर एका भव्य चक्राचे चित्र असून त्यात ग्रामीण जीवन दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. उदा . शेतकऱ्यांची घरे, नगरातील नाचरंग इत्यादी तसेच लेणी क्रमांक मध्ये नृत्यसभेचे चित्र आहे. औरंगाबाद येथील लेणी क्र. ७ मध्ये डाव्या बाजूच्या भिंतीवर नृत्य करणाऱ्या स्त्रियांचा एक समुह आहे. या नृत्य समुहातील प्रमुख नायिका म्हणजे नर्तिका ही औरंगाबादची राजतडाग आहे.[१४]

## चित्रकला -

चित्रकला या शब्दाचा विग्रह चित्र + कला असा होतो. महाराष्ट्र शब्दकोशात चित्र काढण्याच्या कौशल्याला चित्रकला म्हटले आहे. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांच्या मते आपल्या प्राथमिक प्रागैतिहासिक काळातील पूर्वजांनी कोरिव व रंगीत चित्रे विचार प्रदर्शनार्थ काढली असावीत.[१५] अगदी प्राथमिक अवस्थेत मानवाला लेखनकला अवगत नव्हती. म्हणून तो ज्या स्थळी (डोंगर, कपारी, गुहा) राहत असे, तेथील भिंतीवर तो चित्र कोरीत असे. जेथे भाषेने संपूर्ण भावना कळविता येत नसे तेथे उपस्थित मुनष्याला काठीने किंवा बोटाने जमिनीवर, पाने, भूर्जपत्रे इत्यादींवर रंगचित्रे काढून तो आपले मनोगत स्पष्ट करीत असे.

अंजिठा लेणी क्र. १ = बोधिसत्व पद्मपानी →



वाकाटक काळात मराठवाडयात अजिंठा लेण्यामध्येच चित्रकाम करण्यात आले. ही चित्रकला जगप्रसिध्द आहे. चित्राकरिता रंग पाने, फुले, माती, झाडाच्या साली व फळे इ. पासून ते स्वत:च तयार करीत. गिलावा ओला असतानाच आरेखन होई. आरेखनासाठी काव व कोळसा वापरत. सर्वत्र जलरंगाचा वापर होई. या जलरंगात मोरचूद, डिंक तसेच वनस्पतीचा चीक वापरला जाई. त्यामुळे हे रंग अनंत काळ टिकणारे व अत्यंत तेजस्वी बनत.[१६] अजिंठा येथील सर्व चित्रकाम कथानात्मक बोधप्रद असे आहे. लेणी क्र. १,२,१६, व १७ मध्ये चित्रकाम करण्यात आले .बहुतेक चित्रातुन गौतम बुध्दाच्या जीवनातील प्रसंग[१७] जातक कथा चित्रीत केल्या आहेत. स्त्री - पुरुषांची चित्रे शरीरशास्त्रास धरुन अचूक काढली आहेत. चेहऱ्यावरील भाव जिवंत वाटतात.

## समारोप -

वाकाटक कालीन मराठवाडयातील अजिंठा, वेरुळ, औरंगाबाद, घटोत्कच, शिऊर, उस्मानाबाद इत्यादी स्थळांचा अभ्यास केल्यास वाकाटक कालखंड हा प्राचीन भारतातील कला व स्थापत्याच्या दृष्टीकोनातून सुवर्णयुग होता याची प्रचिती येते. या स्थळामध्ये आढळणाऱ्या लयन स्थापत्यावरुन प्राचीन भारतातील वाकाटक घराण्यावर प्रकाश टाकता येतो. वाकाटक काळातील शिल्पे आजही सजीव वाटतात. मराठवाडयाचा परिसर हा खऱ्या अर्थाने प्राचीन भारतीय इतिहासाच्या सांस्कृतिक राजधानीचे केंद्रस्थान आहे. प्राचीन भारतीय इतिहासाचे अमर लेणे मराठवाडयाच्या पावन भूमीत असल्याचे दिसून येते. सौंदर्याचा, कलात्मकतेचा आणि दिव्यत्वाचा साक्षात्कार घडवणारा हा भूप्रदेश आपल्या सांस्कृतिक वैशिष्टयांनी परिपूर्ण असाच आहे. मानवी मनाच्या सहज प्रवृत्तींना आवाहन करणारी शक्ती या क्षेत्रात सामावलेली आहे. मराठवाडयाचे कला वैभव अजिंठा- वेरुळ सोबतच मराठवाडयाच्या अन्य परिसरात देखील कलावंतानी अप्रतिम लेणी निर्माण केली आहे. सजीव बोलके नि सचेतन चित्रकाम व शिल्प ही मराठवाडयातील कलाकारांची महत्वपूर्ण देणगी आहे. येथील सजीव शिल्पे भारताबरोबरच परदेशांचेही लक्ष वेधून घेतात. त्यामुळे शासनाने मराठवाडयाचा हा सांस्कृतिक वारसा जतन करणे आवश्यक आहे.

## संदर्भ सूची -

१) मिराशी वा.वि., सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रिय यांचा इतिहास आणि कोरीव लेख, मुंबई. १९७९. पृ.१०-११
२) मिराशी वा.वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, नागपूर विश्वविद्यालय नागपूर,१९५७.पृ.२४.
३) कित्ता. पृ. २८
४) दाते य.रा. (संपा) म.श. विभाग दुसरा. १९८८ पृ. ६२३.
५) Pathy T.V. & Prasad V.R.N., Ajanta, Eljura and Aurangabad Caves–An appreciation, Bombay. 1972. P. 113,115.
६) कठारे अनिल, मराठवाडयातील लेणी, कल्पना प्रकाशन, नांदेड, नोव्हे. -२०११, पृ.७४.
७) औरंगाबाद डिस्ट्रीक्ट गॅझेटीअर (१८८४) महाराष्ट्र शासन प्रकाशीत, मुंबई. पृ. २५२.
८) Buhalar., Archaeological Sur\rvey of Western India, Vol-IV, 1983. P.134.
९) Deo Prabhakar & Shelk G.C. , Brahmanical Caves of Siur, A.M. Uni. Journal, Vol- XI, 1972. P. 71.
१०) रोडे सोमनाथ व सुतार अमर , धाराशिव येथील जैन लेणी, बाहुबली, कार्यदर्शी अनेकांत शोधपीठ, व्यवस्थापन समिति, १९८६.पृ.३०.

११) पाटील माया., पुरातत्व : एक पर्यालोयन, सुविधा प्रकाशन, सोलापूर १२ मे २०११, पृ. ४०.
१२) Indian Archaeology- A Review,Delhi, 1937-38,P.96
१३) दाते य.रा. (संपा) म.श. विभाग दुसरा. १९८८ पृ. २७९३.
१४) कठारे अनिल, भारतीय कला आणि स्थापत्य, खंड दुसरा, पूनम प्रकाशन कंधार, २००६, पृ. २२.
१५) राजवाडे वि.का., भा.वि.सं.इ. २००६. पृ.१००.
१६) मोरवंचीकर रा.श्री., सा.म. २००९. पृ. २३५.
१७) जोशी सु.ह., महाराष्ट्रातील लेणी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे जाने. २०११ पृ. १९.